तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
गुरुवार दि. २६ जानेवारी २०१७
बेळगाव •

# दिल्लीच्या राजपथावर कोरेगावकरांची हॅट्ट्रीक



**कोरेगाव:** संपूर्ण देश ६८ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करीत आहे. अशावेळी राजधानी दिल्लीत राजपथावर होणारे दिमाखदार संचालन लक्षवेधी असते. राजपथावरील संचलनात कोरेगावच्या डी पी भोसले कॉलेजचा विद्यार्थी सलग सहभागी होऊन अनोखी हॅट्ट्रीक साधली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या डी.पी. भोसले महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेचे युनिट गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे. साताराच्या २२ महाराष्ट्र बटालियनच्या नियंत्रणाखाली हे युनिट कार्यरत असून कोरेगावच्या युनिट मधून अनेक कॅडेट यशस्वी होऊन सैन्य दलांत भरती झाले आहेत. सलग तिसऱ्यांदा या महाविद्यालयाच्या कॅडेटची प्रजासत्ताक दिनाच्या राजपथावरील संचलनासाठी निवड झाली आहे. यंदा विजय संभाजी भोसले हा कॅडेट सहभागी होणार आहे. गतवर्षी स्वप्निल कदम याची निवड झाली होती. तर २०१५ साली विपुल इंगवले याने राजपथावर बाजी मारली होती.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव